प्रेस रिलीज

# ‘महिंद्रा’ने महाराष्ट्रात सुरू केली ‘कृष-ई’ केंद्रे

- ‘कृष-ई’ या महिंद्राच्या नव्या ‘फार्मिंग अॅज अ सर्व्हिस’ (एफएएएस) व्यवसायातून भारतीय शेतीत डिजिटल युग सुरू.
- पिकांसाठी व पीक हंगामातील विविध टप्प्यांसाठी सानुकूलित अशा विविध प्रकारच्या तंत्रज्ञानाद्वारे चालविलेल्या सेवा शेतकऱ्यांना होणार उपलब्ध.
- अॅग्रोनॉमी, यांत्रिकीकरण व डिजिटायझेशन यांच्या सामर्थ्याच्या उपयोगातून शेतकऱ्यांचे प्रति एकर उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न.
- ‘कृष-ई’, ‘कृष-ई निदान’ आणि ‘कृष-ई रेन्टल’ या शेतकऱ्यांसाठीच्या तीन ‘अॅप्स’च्या माध्यमातून, अॅग्रोनॉमी, यंत्रे व उपकरणांची भाडेतत्वावर उपलब्धता व डिजिटायझेशन या सेवा देण्यासाठी ‘कृष-ई’ केंद्रांचा पहिला सेट महाराष्ट्रात कार्यान्वित.

**मुंबई, 2 ऑक्टोबर** : ‘महिंद्रा’च्या नव्या ‘फार्मिंग अॅज अ सर्व्हिस’ (एफएएएस) या व्यवसायाचा एक भाग म्हणून, महिंद्रा अँड महिंद्रा लि. या कंपनीच्या कृषि उपकरणे विभागाने महाराष्ट्रात आज ‘कृष-ई’ केंद्रे कार्यान्वित केली. महिंद्रा अँड महिंद्रा लि. ही 19.4 अब्ज डॉलर्सची उलाढाल असलेल्या महिंद्रा उद्योगसमुहातील एक प्रमुख कंपनी आहे.

“एक्सपर्ट तंत्र, नवीन उपाय, परिणाम दर्शविते”, असे घोषवाक्य असणाऱ्या ‘कृष-ई’च्या व्यवसायातून तंत्रज्ञानाद्वारे चालणाऱ्या प्रगत, परवडणाऱ्या व सुलभ सेवा शेतकऱ्यांना देण्यात येतील. पिकांच्या संपूर्ण हंगामात डिजिटल सेवा देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याचे ‘कृष-ई’चे उद्दिष्ट आहे. या सेवांमध्ये अॅग्रोनॉमीविषयक सल्ला, प्रगत कृषि उपकरणे भाडेतत्वावर देणे आणि नवीन युगातील शेतीतील अचूक उपाययोजना यांचा समावेश आहे. शेतीतील एकंदरीत खर्च कमी करणे, पिकांचे उत्पादन वाढवणे व त्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हे साध्य करण्यावर यामध्ये भर दिला जाणार आहे.

आज महिंद्रा समूह आपला 75वा वर्धापनदिनदेखील साजरा करीत आहे. या समुहाच्या कारकीर्दीची सुरुवात महाराष्ट्रातून झाली होती. त्या निमित्ताने, पहिली ‘कृष-ई’ केंद्रेही औरंगाबाद व बारामती येथे उभारण्यात येत आहेत. महाराष्ट्रातील जालना, वर्धा, नांदेड, पुणे, दौंड व सोलापूर या सहा ठिकाणी ‘कृष-ई’ केंद्रे लवकरच कार्यान्वित होतील.

Copyright © 2020 Mahindra & Mahindra Ltd. All rights reserved.

देशातील इतर राज्यांमध्येही 'कृष-ई' केंद्रे लवकरच टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत. या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी सर्वसमावेशक सेवा उपलब्ध करून देण्यात येतील. शेतकरी आपल्या शेतात व या 'कृष-ई' केंद्रांवर वैयक्तिकृत सेवांचा लाभ घेऊ शकतील. आमच्या 'कृष-ई' सहाय्यकांशी संपर्क साधण्यासाठी ते 'कॉल सेंटर'चा आणि 'कृष-ई ॲप्स'चा उपयोग करू शकतील.

**महिंद्रा अँड महिंद्रा लि. या कंपनीच्या कृषि उपकरणे विभागाचे (एफईएस) प्रमुख हेमंत सिक्का** या ऐतिहासिक प्रसंगी म्हणाले, "कृषि क्षेत्रातील गुंतवणूक व तंत्रज्ञानातील नाविन्यता यांमुळे भारतात कृषि उत्पादन वाढले असले, तरी उत्पादकता आणि शेतीतील उत्पन्न यांच्या वाढीसाठी अजून बराच वाव आहे. 'महिंद्रा'मध्ये आम्हाला या संदर्भात मोठे काम करायचे आहे आणि शेती करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणायचे आहेत. मुख्यत्वे शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीकडे लक्ष ठेवून त्यांना स्पर्धात्मक दरांमध्ये तंत्रज्ञान पुरवणे आणि उन्नतीसाठी सक्षम बनवणे हे आमचे ध्येय आहे."

**सिक्का पुढे म्हणाले**, "महिंद्रा समुहाच्या 75 व्या वर्धापनदिनी 'कृष-ई'चा पहिला सेट कार्यान्वित होत असल्याने आम्ही आनंदित आहोत. भारतात नव्या डिजिटल युगानुसार शेती करण्याची कल्पना 'कृष-ई' या नाविन्यपूर्ण व्यावसायिक पद्धतीने राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यात परिवर्तन घडविण्याचे 'कृष-ई'चे ध्येय आहे. याकरीता आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) यांच्या सहाय्याने शेतीतील तंत्रे अधिक प्रभावीपणे विकसीत करून ती त्यांना उपलब्ध करून देणे आणि वाढती उत्पादकता व नफा वाढवण्याच्या दृष्टीने परवडणारी व सहजी उपलब्ध होणारी डिजिटल सोल्युशन्स त्यांना पुरवणे असे 'कृष-ई'चे नियोजन आहे. 'कृष-ई'च्या माध्यमातून 'महिंद्रा'मध्ये आम्ही शेतकऱ्यांशी दृढ संबंध निर्माण करीत आहोत व त्यांना आमच्याशी जोडून घेत आहोत."

**'एम अँड एम लि.'च्या एफईएस स्ट्रॅटेजी व एफएएस या विभागांचे सिनिअर व्हाईस प्रेसिडेंट रमेश रामचंद्रन** यांनी नमूद केले, "ॲग्रोनॉमी, यांत्रिकीकरण व डिजिटायझेशन या 'कृष-ई'च्या सेवांमधून शेती उत्पादनात होणारा बदल दिसू लागला आहे. 'कृष-ई'च्या माध्यमातून आम्ही एक लाख शेतकऱ्यांना सुविधा पुरविलेल्या आहेत. पीक लागवडीचा खर्च, पिकांचे आरोग्य आणि उत्पादकता या गोष्टींवर परिणाम घडवणारे उपाय आम्ही या शेतकऱ्यांना दाखवून दिले आहेत. 'कृष-ई'कडे सध्या प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी सुमारे 1 हजार प्लॉट्स आहेत. तेथे आम्ही शेतकऱ्यांच्या बरोबरीने काम करून ॲग्रोनॉमी व प्रगत यंत्रे यांच्यामुळे झालेल्या प्रगतीचे दर्शन त्यांना घडवितो. 'कृष-ई'मधून आम्हाला चॅम्पियन शेतकऱ्यांचे राष्ट्र निर्माण करण्याकडे वाटचाल करायची आहे."

Copyright © 2020 Mahindra & Mahindra Ltd. All rights reserved.

**शेतीमध्ये डिजिटल युगाची सुरुवात**

इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) व आर्टिफिशिअल इन्टेलिजन्स (एआय) यांच्या सहाय्याने शेतीच्या परिसंस्थेमध्ये (इकोसिस्टीम) लाभ मिळवून देण्यासाठी, तसेच अचूकपणे शेती करण्याची शक्ती शेतकऱ्यांपर्यंत परवडण्याजोग्या व सुलभ पद्धतीने पोहोचविण्यासाठी 'कृष-ई' कार्य करील. हे साध्य करण्याकरीता 'एम अँड एम'ने जगभरात धोरणात्मक गुंतवणूक केली आहे. यामध्ये 'रेसन' ही कॅनडातील प्रेडिक्टिव्ह ॲनालेटिक्स कंपनी, 'गमाया' ही स्विस हायपरस्पेक्ट्रल इमेज ॲनालेटिक्स कंपनी आणि 'कॅरनॉट' ही भारतीय 'एआय-एनेबल्ड ॲग्रि-आयओटी' कंपनी यांचा समावेश आहे.

'कृष-ई प्रिसिजन फार्मिंग सोल्यूशन्स'मध्ये माती, पीक आणि यंत्रे यांचा डेटा संकलित करण्याकरीता शेतात, ड्रोनवर, उपग्रहांवर आणि शेतीच्या उपकरणांवर विविध प्रकारचे सेन्सर आणि कॅमेरे बसवले जातात. 'एआय अल्गोरिदम'तर्फे हा डेटा वापरून सोपे व भरपूर माहिती असलेले नकाशे बनविण्यात येतात. या नकाशांचा उपयोग शेतकऱ्यांना व 'ॲग्रोनॉमिस्ट'ना शेतांवरील कारभारावर बुद्धिमान यंत्रांच्या सहाय्याने देखरेख ठेवण्यासाठी होतो. बटाटा, द्राक्षे व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लागवडीचा खर्च कमी करण्यासाठी आणि उत्पादन वाढविण्यासाठी या तंत्रज्ञानाचा मोठा उपयोग सध्या होत आहे.

'कृष-ई'ने भिन्न आणि शेतकरी-केंद्रित पद्धतीने सल्ला व भाडे सेवा देण्यासाठी तीन ॲप्स सुरू केली आहेत. यामध्ये पिकासंबंधी सल्लासेवा देण्यात येते; तसेच सानुकूलित व गतिमान अशी पीक दिनदर्शिका, कीटक व रोगनाशक यांचे वास्तविक वेळेतील निदान आणि निराकरण यांचाही त्यात समावेश असतो.

'रेन्टल ॲप'मध्ये 'एआय'ची ताकद मिळालेले 'आयओटी किट' समाविष्ट आहे. यातून उपकरणे व शेतीचे कामकाज यांचा मागोवा घेतला जातो. मोठ्या प्रमाणावर उपकरणे व यंत्रसामग्री बाळगणाऱ्या उद्योजकांची माहिती असलेले हे किट 'प्लग अँड प्ले' स्वरुपाचे, वापरण्यास सोपे आणि अत्यंत परवडणारे आहे. हे किट आतापर्यंत सुमारे 2 हजार रेन्टल उदयोजकांनी वापरलेले असून त्यातून रेन्टल व्यवसायाची कार्यक्षमता व नफा यांच्यात वाढ होते.

**'कृष-ई', 'कृष-ई रेन्टल' आणि 'कृष-ई निदान'** ही तिन्ही ॲप्स 'गूगल प्ले स्टोअर'वरून डाऊनलोड करून घेता येतात.

Copyright © 2020 Mahindra & Mahindra Ltd. All rights reserved.

**‘महिंद्रा’विषयी :**

महिंद्रा समूह हा 19.4 अब्ज डॉलर्स इतकी उलाढाल असलेला अनेक कंपन्यांचा समूह आहे. हा समूह लोकांना नवीन, समृद्ध मोबिलिटी सोल्युशन्स देऊन ग्रामीण भागात समृद्धी आणण्यास, तसेच शहरी नागरिकांचे राहणीमान वाढविण्यास मदत करतो. नवीन व्यवसायांचे व्यवस्थापन आणि समाजोपयोगी कार्येही हा समूह करीत असतो. भारतात युटिलिटी वाहनांचे उत्पादन, माहिती तंत्रज्ञान, आर्थिक सेवा आणि पर्यटन स्थळांच्या क्षेत्रातील उद्योग यांमध्ये या समुहाचे नाव अग्रभागी आहे. महिंद्रा ही जगातील सर्वात मोठी ट्रॅक्टर उत्पादक कंपनी आहे. या समुहाच्या अन्य व्यवसायांमध्ये अपारंपरिक ऊर्जा, कृषि व्यवसाय, लॉजिस्टिक्स, रिअल इस्टेट विकसन या उद्योगांचा समावेश आहे. भारतातच मुख्यालय असलेला महिंद्रा उद्योग समूह 100 देशांमध्ये 2,56,000 हून अधिक लोकांना रोजगार देतो.

महिंद्राविषयक अधिक माहिती जाणून घेण्यासाठी www .mahindra.com / ही वेबसाईट पाहा. ट्विटर व फेसबुकसाठी @MahindraRiseचे अनुसरण करा.

**मीडिया संपर्क :**

मोहन नायर
व्हाईस प्रेसिडेंट (कम्युनिकेशन्स)
महिंद्रा अँड महिंद्रा लि.
दूरध्वनी : +91 22 28468510
ईमेल : nair.mohan @mahindra.com

--

Copyright © 2020 Mahindra & Mahindra Ltd. All rights reserved.